# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दि. २३/०८/२०११ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्र.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६०/२०११/जा.६९४, दि. २६/०८/२०११ व १४/०९/२०११.

३) या कार्यालयाचे "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६०/२०११/जा.६९५, दि. २६/०८/२०११.

४) पोलीस उप निरीक्षक, शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ यांचे दिनांक २०/०८/२०११ व ०३/०९/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

५) शक्ती भोग आटा मिलचे मालक सुनिल मोदी, ट्रक क्र. एमटीएस-५६३४ चे मालक गुलवास शेख यांचे वतीने प्राधिकारपत्रासह व चालक म्हणून अस्पाक गुलवास शेख, ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे चालक रामहरी भगवान वाघमारे, ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे मालक सुदाम रामभाऊ सानप, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ- ७,क४० फ- ९, ४० फ- १०, ४० फ- ७८, ४० फ- २६८ व ४० फ- ८० चे मालक यांचे दिनांक १३/०९/२०११ रोजीचे स्वतंत्र निवेदन.

६) गुलाब बी. हरचंदानी यांचे दिनांक २०/०९/२०११ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६०/२०११/जा. ८३२<br>
नियंत्रक शिधावाटप व संचालक<br>
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,<br>
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,<br>
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.<br>
दिनांक : १८/१०/२०११.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

अंबरनाथ पूर्व, चिखलोली येथील शक्ती भोग आटा मिल समोर रेशनिंगचे गव्हाचे गोण्या भरलेले दोन ट्रक खाली करत असताना श्री. तुषार देशमुख, उपाध्यक्ष आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असो., महाराष्ट्र प्रदेश तसेच श्री. शैलेश शिर्के, म.न.से. अध्यक्ष, अंबरनाथ शहर तसेच त्यांचे कार्यकर्ते यांनी दिनांक १७/०८/२०११ रोजी रात्रौ १०:३०

वा. चे सुमारास पकडले. त्यानुसार पंचास बोलावून सदर ट्रकचे चालक अशपाक गुलबास शेख व रामहरी भगवान वाघमारे यांचेकडे सदर मालाचे चलनाबाबत पंचासमक्ष विचारणा केली असता, त्यांनी त्यांचेकडे असलेले चलन दाखविले. चलन पाहता, सदरचा गहू हा भारतीय खाद्य निगम येथील गोदामातून आणला असून तो शिधावाटप कार्यालय क्र. ४० फ, उल्हासनगर (उप) साठी पाठविला असल्याचे दिसून आले. तसेच ट्रक क्र. एमटीएस-५६३४ मधील ४० गव्हाच्या गोण्या (प्रत्येकी ५० किलो) या शक्तीभोग आटा मिल या कंपनीत उतरविला आल्याचे व त्या चक्कीमध्ये पिसल्याचे तेथील कामगाराकडून समजले. तसेच ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ मध्ये २४० गव्हाच्या गोण्या (प्रत्येकी ५० किलो वजनाच्या) आढळून आल्या. सदर ट्रक सोबत मिळालेल्या मालाचे पावतीनुसार गहू हा रेशनिंगचा असल्याचे नमूद असून त्यांनी सदरचे दोन्ही ट्रक पंचनामा करुन ताब्यात घेतले आहे व शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे आवारात आणून उभे केले आहेत. सदर ट्रकमधील गव्हाची माल पावतीची (बिल्टीची) पाहणी करुन सदरचा गहू काळे बाजारात विक्रीसाठी आणला किंवा कसे ? याबाबत दिनांक १८/०८/२०११ रोजी शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालय, अंबरनाथ यांना सकाळी ११:०० वाजता शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ (पूर्व) येथून लेखी पत्राद्वारे याबाबतची माहिती देण्याकरिता कळविण्यात आले.

त्यानुसार शिधावाटप कार्यालय, अंबरनाथ येथील शिधावाटप अधिकारी यांनी दुपारी १२:०० वाजताचे सुमारास शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथ येथे भेट देवून, पोलिस स्टेशनच्या आवारात उभे असलेल्या ट्रक क्र. एमटीएस-५६३४ व ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ मधील गव्हाची पाहणी केली असता, सदरच्या दोन्ही ट्रकमधील गहू रेशनिंगचा असल्याबाबत तसेच ट्रक क्र. एमटीएस-५६३४ मधील ४० गव्हाच्या गोण्या (प्रत्येकी ५० किलो) या शक्तीभोग आटा मिल या कंपनीत उतरविला असल्याबाबत पंचनाम्यावरुन दिसून आले. तसेच दोन्ही ट्रक सोबत असलेल्या कागदपत्रावरुन (बिल्टी) सदर ट्रकमधील माल हा अनुक्रमे २४० गोणी व २४० गोणी असे एकूण ४८० गव्हाच्या गोण्या भारतीय खाद्य निगम, भिवंडी येथील गोदामातून दिनांक १७/०८/२०११ रोजी शिधावाटप कार्यालय क्र. ४० फ, उल्हासनगर (उप) साठी पाठविला होता.

अशाप्रकारे संबंधितानी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू हा भारतीय खाद्य निगम भिवंडी येथील गोदामातून भरुन नियोजित ठिकाणी न नेता त्याचा काळाबाजार करण्याच्या उद्देशाने शक्तीभोग आटा मिल या कंपनीत नेला असल्याचे सिध्द झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, १० चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ येथे गुन्हा नोंद क्र. II २१/२०११ दि.१८/०८/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

CONTROLLER OF RATIONING ... HEAD

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ट्रक क्र. एमटीएस-५६३४ | १ नग | ५,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील २०० गोणी गहू (प्रत्येकी ५० किलो ) | १०० क्विंटल | ७०,०००/- |
| ३ | ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ | १ नग | ५,००,०००/- |
| ४ | उक्त ट्रकमधील २४० गोणी गहू (प्रत्येकी ५० किलो ) | १२० क्विंटल | ८४,०००/- |
| | | एकूण | ११,५४,०००/- |

प्रस्तूत प्रकरणी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी केलेल्या अधिक चौकशीत, ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ मधील २४० गोणी गहू हा वितरण आदेश क्र. ०२२६७१३, दिनांक ११/०८/२०११ नुसार अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ/७, ४० फ/९ व ४० फ/१० साठी तसेच ट्रक क्र. एमटीएस-५६३४ मधील २४० गोणी गहू हा वितरण आदेश क्र. ०२२१५८५, दिनांक ०४/०८/२०११ व वितरण आदेश क्र. ०२२१६१७, दि. ११/०८/२०११ नुसार अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ/७८, ४० फ/८० व ४० फ/२६८ साठी भारतीय खाद्य निगम, भिवंडी येथील गोदामातून थेट उचलीद्वारे उचलण्यात आला असल्याचे उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी त्यांचे दिनांक २०/०८/२०११ अन्वये कळविले आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली आहे. सबब, शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथ येथे गुन्हा नोंद क्र. II २१/२०११ दिनांक १८/०८/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्येमाल शासनजमा का करण्यात येऊ नये, याबाबत वाचावे क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून या कार्यालयात दिनांक १३/०९/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस उप निरीक्षक श्री एस. एस. शेवाळे उपस्थित राहीले. तसेच सदर सुनावणीस शक्ती भोग आटा मिलचे मालक सुनिल मोदी, ट्रक क्र. एमटीएस-५६३४ चे मालक गुलवास शेख यांचे वतीने प्राधिकारपत्रासह व चालक म्हणून अस्पाक गुलवास शेख, ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे चालक रामहरी भगवान वाघमारे, ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे मालक सुदाम रामभाऊ सानप, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ- ७, ४० फ- ९, ४० फ- १०, ४० फ- ७८, ४० फ-२६८ व ४० फ- ८० चे मालक उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र निवेदन सादर केले.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
BAI

सुनावणीचेवेळी अधिकृत शिधावाटप दुकानाचे मालक यांनी अन्नधान्याचा साठा उचल करणेसाठी गुलाब बी. हरकचंदानी यांना प्राधिकृत केल्याचे मौखिक सांगीतले. सबब, गुलाब बी. हरकचंदानी यांचे म्हणणे ऐकूण घेणे आवश्यक असल्याने प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक २०/०९/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस गुलाब बी. हरकचंदानी व नमुद सर्व अधिकृत शिधावाटप दुकानाचे मालक उपस्थित राहीले व गुलाब बी. हरकचंदानी यांनी त्यांचे वाचावे क्र. ६ अन्वये निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथचे पोलीस उप निरीक्षक यांनी सादर केलेल्या दिनांक ०३/०९/२०११ रोजीच्या लेखी अभिवेदनात, दिनांक १८/०८/२०११ रोजी घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमाला व्यतिरिक्त त्यांना पुढील तपासात दिनांक २०/०८/२०११ रोजी ४० गोणी प्रत्येकी ५० किलो वजनाच्या गव्हाचा आटा किंमत रुपये २६,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील एकूण जप्त मुद्देमाल पोलीस ठाणेचे आवारात ट्रक मध्ये ठेवलेला असून, पोलीस ठाणेचे आवारात सदरचा माल ठेवणेस जागा नाही. पावसाचे दिवस असल्याने ट्रकमध्ये पाणी जाऊन गहू व जप्त केलेला गव्हाचा आटा खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी जप्त मुद्देमालाचे आदेश होणेची विनंती आहे, असे नमुद केले आहे.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित शक्ती भोग आटा मिलचे मालक सुनिल मोदी यांनी युक्तिवाद केला की, त्यांची फॅक्टरी आहे तो विभाग इंडस्ट्रीयल असून, त्या ठिकाणी अनेक गाड्या उभ्या असतात व या ठिकाणी कोणताही चालक त्यांच्या गाड्या आणून उभ्या करतात. त्याबाबत ते काहीही करुन शकत नाही. तसेच या कंपाऊंडमध्ये कोणत्याही प्रकारची सेक्युरीटी नसल्यामुळे या ठिकाणी कोणीही गाडी उभी करतो व त्यामध्ये काय असते ते आम्हाला माहिती नसल्यामुळे कोणीतरी जाणूनबूजून त्यांना या प्रकरणात अडकविण्याचा प्रयत्न केलेला आहे. रेशनिंग अधिकाऱ्यांनी अंदाज करुन, हा गहू त्यांच्या फॅक्टरीमध्ये अनलोडींग केलेला आहे. परंतू अधिकाऱ्यांचा अंदाज पुर्णत: चुकीचा आहे. कारण त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नसून त्यांना खोट्या केसमध्ये अडकविण्याचा प्रयत्न झालेला आहे. तरी त्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस ट्रक क्र. एमटीएस-५६३४ चे मालक गुलवास शेख यांचे यांनी प्राधिकारपत्रास व सदर ट्रकचे चालक म्हणून उपस्थित अस्याक गुलवास शेख यांनी युक्तिवाद केला की, तो ४० फ उल्हासनगर येथील रेशनिंग दुकानदार व गुलाब हरचंदानी यांचा दुकानांचा अधिकृत प्रतिनीधी आहे. त्यांचे

सांगण्यावरुन तो भिवंडी येथील एफसीआय गोदामामधून नमुद सहा दुकानदारांचा गहू घेवून सदरची गाडी क्र. एमटीएस-५६३४ उल्हासनगर फार्बर लाईन येथे पार्कीग करीत असतांना तीन-चार इसम त्याच्या गाडीजवळ आले. त्यावेळेस त्याच्या बरोबर एमएच-०४-सीपी-६४१३ ही गाडीसुध्दा होती. या इसमांनी दोन्ही गाडीच्या चालकाला धमकाविले व बोलले की, ही जागा पार्कींगची नसून, येथे गाडी उभी केली तर ट्राफिक जाम होईल. त्यानंतर त्याने या इसमांना सांगीतले की, अधिकृत प्रतिनिधी गुलाब हरकचंदानी हा त्या गाड्यांची काळजी घेईल, असे रेशनिंग अधिकारी श्री शेवाळे साहेबांनी सांगीतलें आहे. तरीसुध्दा त्या इसमांनी दोन्ही चालकाला मारहाण केली व सांगीतले की, तुम्ही आमच्याबरोबर चला, आम्ही तुमची पार्कीगची व्यवस्था करतो. त्यानंतर त्या इसमांनी बालाजी आटा मिलमध्ये नेले व पोलीसांना बोलावून त्यांच्यावर जबरदस्तीने गुन्हा दाखल केला. या गाड्यांच्या व्यवसायावरच त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह आहे. तसेच त्याचा दुसरा कोणताही रोजगार नसल्याने, त्याचा जप्त ट्रक बॉण्डवर सोडवावा व न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत ट्रक विकणार नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे चालक रामहरी भगवान वाघमारे यांनी युक्तिवाद केला की, सदर ट्रकवर तो चालक म्हणून काम करतो. दिनांक १७/०८/२०११ रोजी उल्हासनगर शिधावाटप विभागातील रेशनिंग दुकानासाठी गहू वितरण करण्यासाठी त्याने सदर ट्रक भरला होता. उल्हासनगर फार्बर लाईन येथे गाडी उभी केली. त्यानंतर चार पाच अनोळखी इसम आले व सांगीतले की, इकडे गाडी कशी काय-उभी केली. इकडून गाडी काढा व बरोबर चला. तसेच त्या इसमांनी त्याला मारहाण केली. त्यानंतर अंबरनाथ येथील बालाजी आटा मिल येथे गाडी आणून उभी केली व पोलीसांना बोलावून सांगीतले की, हे ट्रक येथे गहू विकण्यासाठी आले आहे. तसेच मनसेच्या काही २०-२५ कार्यकर्ते जमा होवून मारहाण करुन जबरदस्तीने त्याच्यावर गुन्हा दाखल केला, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे मालक सुदाम रामभाऊ सानप यांनी युक्तिवाद केला की, सदर ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ हा त्याचे मालकीचा आहे व ज्या संघटीत संस्थांना किंवा दुकानदारांना धान्यांची वाहतूक करण्यासाठी ट्रक लागतो, त्यांना ट्रक भाड्याने देत आहे. दिनांक १७/०८/२०११ रोजी भारतीय खाद्य निगमच्या भिवंडी आगारातून त्याचा ट्रक उल्हासनगरच्या शिधावाटप दुकानदारांना गहू वितरीत करण्यासाठी गुलाब हरचंदानी यांना दिला होता. गोदामातून गाडी भरुन त्यांने स्वत: उल्हासनगर शिधावाटप क्षेत्रात गाडी पार्क करुन निघून आल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना समजले की, त्यांचा ट्रक अंबरनाथ येथील पोलीस ठाणेत जमा करण्यात आला आहे. ही घटना कशी घडली, याबाबत त्याचा गाडी चालक रामहरी वाघमारे यांनी त्यांना दुसऱ्या दिवशी माहिती दिली की, त्यांचा ट्रक काही मनसेच्या कार्यकत्यांनी अंबरनाथ येथील बालाजी प्रोसेसर्स म्हणून आटा मिलमध्ये जबरदस्तीने आणून उभा केला व २५-५० लोकांना जमा करुन

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE BAI

पोलीसांना बोलावून खोटा आरोप लावून गुन्हा दाखल केला. सदरचा गुन्हा उल्हासनगर न्यायालयात न्यायप्रविष्ट असून, या गाडीच्या व्यवसायावरच त्याच्या कुटूंबाचे पालनपोषण अवलंबून आहे. तरी त्यांचा जप्त ट्रक बॉण्डवर सोडावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ- ७, ४० फ- ९, ४० फ- १०, ४० फ- ७८, ४० फ- २६८ व ४० फ- ८० चे मालक यांनी युक्तिवाद केला की, त्यांना रेशनिंग विभागाकडून त्यांच्या दुकानाच्या नावे अन्नधान्याकरिता वितरण आदेश निर्गमित केले असून शासकीय गोदामातून अन्नधान्याची उचल करण्याची जबाबदारी त्यांची आहे. भिवंडी येथील शासकीय गोदामातून अन्नधान्याची उचल करुन सदर शिधावाटप दुकानामध्ये वितरण करण्यासाठी वाहतूक ठेकेदार म्हणून त्यांनी मे. मा शेरावाली ट्रान्सपोर्टचे मालक सुदाम सानप यांना अधिकृतपणे प्राधिकृत केल्याचे स्वतंत्र लेखी निवेदन सादर करुन त्यांनी मौखिकरित्या गुलाब हरचंदानी यांना वाहतूकदार म्हणून प्राधिकृत केल्याचे सांगितले.

दिनांक २०/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गुलाब बी. हरचंदानी यांनी युक्तिवाद केला की, भिवंडी येथील भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून त्यांच्या सहा ट्रकद्वारे अन्नधान्याची उचल करुन उल्हासनगर येथील अधिकृत शिधावाटप दुकानांना सदर अन्नधान्याचे ते अधिकृत वितरण करतात. अन्नधान्याने भरुन आणलेल्या ट्रकबरोबर रेशनिंग निरीक्षक श्री शेवाडे हे होते. दिनांक १७/०८/२०११ रोजी संध्याकाळी अन्नधान्य आणले व उल्हासनगर येथे रात्रीच्या वेळेस पोहचले. सदरचे ट्रक राधा स्वामी सत्संग हॉल, कल्याण-अंबरनाथ रोड, उल्हासनगर ३ येथे पार्क केले. त्याने वाहतूक ठेकेदार म्हणून मे. मा शेरावाली ट्रान्सपोर्ट चे मालक सुदाम सानप यांचेशी केलेल्या लेखी करारानुसार भिवंडी येथील शासकीय गोदामातून अन्नधान्याची उचल करुन उल्हासनगर येथील शिधावाटप दुकानामध्ये वितरण करतात. दिनांक १८/०८/२०११ रोजी सकाळच्या वेळी ते चकीत झाले की, सहा ट्रकपैकी दोन ट्रक मिसिंग झाले आहे. याबाबत त्याने तात्काळ उल्हासनगरचे शिधावाटप अधिकारी यांना सुचित केले. त्याने या ट्रकबाबत चौकशी करण्याच्या प्रयत्न केला असता, सदरचे ट्रक शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथ येथे जप्त केल्याचे समजले, असे सांगून तसे लेखी निवेदन व करारनामा सादर केला.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

CONTROLLER OF RATIONING HEAD ... MU...

प्रस्तुत प्रकरणी श्री. तुषार देशमुख, उपाध्यक्ष आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असो., महाराष्ट्र प्रदेश तसेच श्री. शैलेश शिर्के, म.न.से. अध्यक्ष, अंबरनाथ शहर व त्यांचे कार्यकर्ते यांनी दिनांक १७/०८/२०११ रोजी रात्रौ १०:३० वा. चे सुमारास शक्ती भोग आटा मिलचे समोर रेशनिंग गव्हाचे गोण्या भरलेले दोन ट्रक पकडले. त्यानुसार पंचास बोलावून सदर ट्रकचे चालक अशपाक गुलबास शेख व रामहरी भगवान वाघमारे यांचेकडे सदर मालाचे चलनाबाबत पंचासमक्ष विचारणा केली असता, त्यांनी त्यांचेकडे असलेले चलन दाखविले. चलन पाहता, सदरचा गहू हा भारतीय खाद्य निगम येथील गोदामातून आणला असून तो शिधावाटप कार्यालय क्र. ४० फ, उल्हासनगर (उप) साठी पाठविला असल्याचे दिसून आले. तसेच ट्रक क्र. एमटीएस-५६३४ मधील ४० गव्हाच्या गोण्या (प्रत्येकी ५० किलो) या शक्तीभोग आटा मिल या कंपनीत उतरविला आल्याचे व त्या चक्कीमध्ये पिसल्याचे तेथील कामगाराकडून समजले. तसेच ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ मध्ये २४० गव्हाच्या गोण्या (प्रत्येकी ५० किलो वजनाच्या) आढळून आल्या. सदर ट्रक सोबत मिळालेल्या मालाचे पावतीनुसार गहू हा रेशनिंगचा असल्याचे नमूद असून त्यांनी सदरचे दोन्ही ट्रक पंचनामा करुन ताब्यात घेतले व शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे आवारात आणून उभे केले. सदर ट्रकमधील गव्हाची माल पावतीची (बिल्टीची) पाहणी करुन सदरचा गहू काळ्या बाजारात विक्रीसाठी आणला किंवा कसे ? याबाबत दिनांक १८/०८/२०११ रोजी शिधावाटप अधिकारी, अंबरनाथ यांना सकाळी याबाबतची माहिती देण्याकरिता लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार अंबरनाथ येथील शिधावाटप अधिकारी यांनी दुपारी १२:०० वाजताचे सुमारास शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथ येथे भेट देवून, पोलिस स्टेशनच्या आवारात उभे असलेल्या ट्रक क्र. एमटीएस-५६३४ व ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ मधील गव्हाची पाहणी केली असता, सदरच्या दोन्ही ट्रकमधील गहू रेशनिंगचा असल्याबाबत तसेच ट्रक क्र. एमटीएस-५६३४ मधील ४० गव्हाच्या गोण्या (प्रत्येकी ५० किलो) या शक्तीभोग आटा मिल या कंपनीत उतरविला असल्याबाबत पंचनाम्यावरुन दिसून आले. तसेच दोन्ही ट्रक सोबत असलेल्या कागदपत्रावरुन (बिल्टी) सदर ट्रकमधील माल हा अनुक्रमे २४० गोणी व २४० गोणी असे एकूण ४८० गव्हाच्या गोण्या भारतीय खाद्य निगम, भिवंडी येथील गोदामातून दिनांक १७/०८/२०११ रोजी शिधावाटप कार्यालय क्र. ४० फ, उल्हासनगर (उप) साठी पाठविला असल्याचे आढळले. यावरुन सदर दोन्ही ट्रक व त्यामधील गव्हांचा साठा जप्त करण्यात आला. त्यापैकी शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथचे पोलीस उप निरीक्षक यांनी सादर केलेल्या दिनांक ०३/०९/२०११ रोजीच्या लेखी अभिवेदनात, दिनांक १८/०८/२०११ रोजी घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमाला व्यतिरिक्त त्यांना पुढील तपासात दिनांक २०/०८/२०११ रोजी ४० गोणी प्रत्येकी ५० किलो वजनाच्या गव्हाचा आटा किंमत रुपये ६६,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

ट्रक क्र. एमटीएस-५६३४ चे चालक म्हणून उपस्थित अस्पाक गुलवास शेख व ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे चालक रामहरी भगवान वाघमारे यांनी केलेल्या खुलाशात, ते गुलाब हरचंदानी यांच्या सांगण्यावरुन दिनांक १७/०८/२०११ रोजी उल्हासनगर शिधावाटप विभागातीले नमुद सहा रेशनिंग दुकानात गहू वितरण करण्यासाठी भिवंडी येथील एफसीआय गोदामामधून गहू घेवून सदरच्या गाड्या उल्हासनगर फार्बर लाईन येथे पार्कींग करीता असतांना तीन-चार अनोळखी इसम त्यांच्या गाडीजवळ आले या इसमांनी त्यांना धमकविले व ही जागा पार्कींगची नसून, येथे गाडी उभी केली तर ट्राफिक जाम होईल, असे बोलले. त्या इसमांनी या दोन्ही चालकाला मारहाण केली व सांगीतले की, तुम्ही आमच्याबरोबर चला, आम्ही तुमची पार्कींगची व्यवस्था करतो. त्यानंतर त्या इसमांनी बालाजी आटा मिलमध्ये नेले व पोलीसांना बोलावून त्यांच्यावर जबरदस्तीने गुन्हा दाखल केला. तसेच मनसेच्या काही २०-२५ कार्यकर्ते जमा होवून मारहाण केली असल्याचे नमुद केले आहे. तसेच शक्ती भोग आटा मिलचे मालक यांनी केलेल्या खुलाशात, त्यांची फॅक्टरी इंडस्ट्रीयल विभागात असल्याने तेथे कोणताही चालक त्यांच्या गाड्या आणून उभ्या करतात व त्यामध्ये काय असते ते आम्हाला माहिती नसल्यामुळे कोणीतरी जाणूनबूजून त्यांना या प्रकरणात अडकविण्याचा प्रयत्न केलेला आहे. रेशनिंग अधिकाऱ्यांनी अंदाज केला की, हा गहू त्यांच्या फॅक्टरीमध्ये अनलोंडींग केलेला आहे. परंतू अधिकाऱ्यांचा अंदाज पुर्णत: चुकीचा आहे. कारण त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नसून त्यांना खोट्या केसमध्ये अडकविण्याचा प्रयत्न झालेला असल्याचे नमुद केले आहे. तसेच नमुद सहाही अधिकृत शिधावाटप दुकानदरांनी खुलासा केला की, ते अधिकृत वाहतुक दाराकडून अन्नधान्याची शासकीय गोदामातून उचल करतात. त्यामुळे त्यांचा या गुन्ह्याशी संबंध नाही. दोन्ही ट्रकचे चालक व शक्ती भोग आटा मिलचे मालक यांनी त्यांच्यावर केलेले आरोप अमान्य केले असले तरी, घटनेच्यावेळी ट्रक चालक रामहरी भगवान वाघमारे व अशफाक गुलबास शेख यांनी दिलेल्या लेखी जबाबात, त्यांचे मालक सुदाम सानप यांचे सांगण्यावरुन भिवंडी येथील गोदामातून २४० गोण्या ट्रकमध्ये भरुन उल्हासनगर येथे आणले व गाड्या पार्क केल्या. रात्रीच्या वेळी अशफाक गुलबास शेख यांच्या भ्रमणध्वनीवर आलेल्या सुचनेनुसार दोन्ही ट्रक शक्ती भोग आटा मिल, चिखलोली अंबरनाथ येथे उभ्या केल्या. त्यानंतर गाडयामधील माल खाली होईपर्यंत मिलच्या रुममध्ये बसण्यास सांगील्याप्रमाणे ते दोघेही मिलमध्ये बसले. त्यानंतर ट्रकजवळ आले असता, पोलीस आल्याचे त्यांना समजले, असा जबाब दिला आहे. दोन्ही ट्रकचे चालक यांनी सुनावणीचेवेळी केलेला खुलासा व घटनास्थळी दिलेला जबाब एकमेकाशी विपर्यास्त असल्याचे दिसून येते.

तसेच नमुद अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी केलेल्या खुलाशात, त्यांना रेशनिंग विभागाकडून त्यांच्या दुकानाच्या नावे अन्नधान्याकरिता वितरण आदेश निर्गमित केले असून शासकीय गोदामातून अन्नधान्याची उचल

CONTROLLER OF RATIONING HEAD

करण्याची जबाबदारी त्यांची आहे. तथापी, भिवंडी येथील शासकीय गोदामातून अन्नधान्याची उचल करुन त्यांच्या शिधावाटप दुकानामध्ये वितरण करण्यासाठी वाहतूक ठेकेदार म्हणून त्यांनी त्यांच्या स्तरावर मे. मा शेरावाली ट्रान्सपोर्टचे मालक सुदाम सानप यांना अधिकृतपणे प्राधिकृत केल्याचे स्वतंत्र लेखी निवेदन सादर करुन त्यांनी मौखिकरित्या गुलाब हरचंदानी यांना वाहतूकदार म्हणून प्राधिकृत केल्याचे सांगितले व त्यांचा या गुन्ह्यात कोणताही संबंध नसून, गोदामातून उचलेले धान्य दुकानात न आणणे ही त्यांची जबाबदारी नाही. तथापी, नमुद सहाही दुकानदार गोदामातून अन्नधान्याची थेट उचल करीत असून, सदर दुकानदारांनी अन्नधान्याची स्वत: उचल न करता अन्य व्यक्तिला परस्पर प्राधिकृत केले आहे. असे असले तरी थेट उचलीच्या बाबतीत शिधावाटप दुकानदारांनी गोदामातून अन्नधान्याची स्वत: उचल करुन तो दुकानापर्यंत आणणे व त्याचे शिधापत्रिकाधारकांना वितरण करणे याची सर्वस्वी जबाबदारी त्या दुकानदारांची आहे. तथापी, ही जबाबदारी पार न पाडता, सर्व संबंधीतांनी संगणमत करुन शासन नियंत्रीत गव्हाचा गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने गव्हाने भरलेले सदरचे जप्त ट्रक हे शक्ती भोग आटा मिल येथे घटनास्थळी आणले असल्याचे तसेच सदर ट्रकमधील गव्हाच्या काही गोण्या शक्ती भोग आटा मिलमध्ये उतरविल्या असल्याचे पंचनाम्यावरुन दिसून येते. प्रस्तूत प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आलेला असून त्याची सत्यासत्यता मा. न्यायालयात तपासली जाईलच. मात्र सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन आरोपी यांनी शासनाने शिधापत्रिकेव्दारे अधिकृत शिधावाटप दुकानातून शिधापत्रिकाधारकांना वाटप करण्यासाठी अनुदानित दराने उपलब्ध करुन दिलेला सदरचा शासन नियंत्रीत गव्हाचा साठा अवैधमार्गाने तसेच जादा नफेखोरीच्या उद्देशाने शक्ती भोग आटा मिलमध्ये नेवून त्याची बेकायदेशीररित्या खरेदी, विक्री व वाहतूक केली असल्याचे स्पष्ट होते. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६०/२०११/जा.६९५, दि.२६/०८/२०११ चे अंतरिम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तथापी, पोलिसांनी केलेल्या पुढील तपासात दिनांक २०/०८/२०११ रोजी ४० गोणी प्रत्येकी ५० किलो वजनाच्या गव्हाचा आटा किंमत रुपये २६,०००/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरचा साठा ट्रक क्र. एमटीएस-५६३४ मधील ४० गव्हाच्या गोण्या (प्रत्येकी ५० किलो) या शक्तीभोग आटा मिल या कंपनीत उतरविला असल्याबाबत पंचनाम्यात नमूद असल्याने सदरचा ४० गोणी (प्रत्येकी ५० किलो) गव्हाचा आटा हा शासनजमा करण्यात येत आहे. सदरचा साठा हा प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमटीएस-५६३४ हा गुलबांस शेख यांच्या मालकीचा असल्याचे, गुलबास शेख यांचेवतीने त्यांचा मुलगा व चालक असफाक शेख यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. तसेच असफाख शेख यांनी सादर केलेल्या खुलाशात, त्यांचा सदरचा ट्रक चार ते पाच अनोळखी इसमाने जबरदस्तीने शक्ती भोग मिल आटा येथे आणून खोटा गुन्हा दाखल केला असल्याचे नमूद करुन सदर ट्रकच्या व्यवसायावरच त्याचे कुटूंबीयांचे उदरनिर्वाह अवलंबून असल्याने जप्त ट्रक त्यांना परत मिळावा, अशी विनंती केली आहे. तथापी, असफाक शेख यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबावरुन, गुलाब शेठ यांनी सांगीतल्यानुसार गव्हाचा गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने सदरचा ट्रक जाणीपूर्वक मिलमध्ये नेला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असून, आरोपी यांनी सदर ट्रकचा गैरवापर केला असल्याचे स्पष्ट होते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमटीएस-५६३४ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रकचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, ट्रकच्या मालकीबाबत कोणताही कायदेशी पुरावा सादर न केल्याने अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

तसेच प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ हा सुदाम रामभाऊ सानप यांच्या मालकीचा असल्याचे त्यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. तसेच त्यांनी सादर केलेल्या खुलाशात, ज्या संघटीत संस्थांना किंवा दुकानदारांना धान्यांची वाहतूक करण्यासाठी ट्रक लागतो, त्यांना ट्रक भाड्याने देत असतात. त्यानुसार सदरचा ट्रक भारतीय खाद्य निगमच्या भिवंडी गोदामातून उल्हासनगरच्या शिधावाटप दुकानदारांना गहू वितरीत करण्यासाठी गुलाब हरचंदानी यांना दिला होता. गोदामातून गाडी भरुन त्यांने स्वतः उल्हासनगर शिधावाटप क्षेत्रात गाडी पार्क करुन निघून आल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना सदरची घटना सदर ट्रकचे चालक रामहरी वाघमारे याचेकडून समजली असल्याचे नमुद केले आहे. तथापी, सदर ट्रकचे चालक रामहरी वाघमारे यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबावरुन, गुलाब शेठ यांनी सांगीतल्यानुसार गव्हाचा गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने सदरचा ट्रक जाणीपूर्वक मिलमध्ये नेला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असून, सुनावणीचेवेळी केलेला खुलासा व घटनास्थळी दिलेला जबाब एकमेकाशी विपर्यास्त असल्याचे दिसून येत आहे. यावरुन, आरोपी यांनी सदर ट्रकचा गैरवापर केला असल्याचे स्पष्ट होते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ हा त्याच्या बाजारमुल्या

CONTROLLER OF RATIONING HEAD

एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रकचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, ट्रकच्या मालकीबाबत कोणताही कायदेशी पुरावा सादर न केल्याने अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरते सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी; नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्राप्त झालेल्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथ येथे गुन्हा नोंद क्र. II २१/२०११ दि.१८/०८/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश :-</u>**

१) या कार्यालयाचे दिनांक २६/०८/२०११ रोजीचे अंतरिम आदेश कायम करण्यात येत आहे.

२) जप्त करण्यात आलेला ४० गोणी (प्रत्येकी ५० किलो) गव्हाचा आटा हा शासनजमा करण्यात येत आहे. सदरचा साठा हा प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्यात यावी.

३) जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमटीएस-५६३४ व ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ हे शासनजमा करण्यात येत आहेत. सदर प्रत्येकी ट्रकच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे ट्रक त्यांच्या मालकांस परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी दोन्ही ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा ट्रकचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. एमटीएस-५६३४ चे मालक
२) ट्रक क्र. एमटीएस-५६३४ चे चालक, अशपाक गुलबास शेख
३) ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे मालक
४) ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चे चालक, रामहरी भगवान वाघमारे
५) शक्तीभोग आटा मिलचे मालक, सुनिल मोदी
६) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ/७ चे मालक
७) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ/९ चे मालक
८) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ/१० चे मालक
९) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ/७८ चे मालक
१०) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ/८० चे मालक
११) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४० फ/२६८ चे मालक
१२) गुलाब बी. हरचंदानी, वाहतूकदार
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, कां.क्र. ६, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
~~५) निवड नस्ती.~~

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.